नि.दि.दा.क्र.११/२०२१
भागीरथाबाई वि. शासन
वादी तर्फे सा.क्र.४
(नि.क्र.९४)

//०//

**माझे नाव - गणेश पांडुरंग तेलगावे वय – ३९ वर्षे,ख्**
**धंदा - नोकरी रा. बोरवळ ता. देवणी जि लातूर**

**वादीतर्फे श्री. आर.आर.विहीरे यांच्यामार्फत सरतपास सुरु.**

**१.** मी बँक ऑफ इंडिया शाखा अहमदपूर मी ०९/०६/२०२३ पासून वरिष्ठ शाखाप्रमुख म्हणून कार्यरत आहे. नामदेव अंकनगीरे व धनंजय नामदेव अंकनगीरे याची बचत खाती आमच्याकडे आहेत. नामदेव यांचा खाते क्रंमाक ०७६४१८२१०००४४३१ असा आहे. धनंजय अंकनगीरे यांचा खाते क्रंमाक ०७६४१०११०००८५४२ असा आहे. दि.०१/१२/२०२१ रोजी नामदेव याच्या खात्यावर रु.५ लाख जमा झाले ते त्यांच्याच लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकतील खाते क्रं. ८०८५११००२११२७५१ खात्यावरुन आलेली रक्कम आहे. दि.०३/१२/२०२१ रोजी रु.५ लाख लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकतील खाते क्रं. ८०८५११००२११२७५१ खात्यावरुन आलेली रक्कम आहे. दि.०६/१२/२०२१ रोजी रु.१५,५०,०००/- ही रक्कम त्यांनी एफ.डी. तयार केल्यामुळे डेबीट झाली. दि.०७/१२/२०२१ रोजी रु.४,५०,०००/- ही रक्कम त्यांनी एफ.डी तयार केल्यामुळे डेबीट झाली. या दोन्ही एफ.डी.दि.१०/१२/२०२२ रोजी मोडून पुन्हा त्यांच्या खात्यावर जमा करण्यात आली. दि.१०/०१/२०२२ ते १४/०१/२०२२ या काळात दररोज रु.२ लाख रोख त्यांनी काढले व दि.१४/०१/२०२२ रु. १० लाख धनंजय अंकनगीरे यांच्या खात्यावर वर्ग केले. ट्रान्सफर व्हाऊचरने ती रक्कम धनंजय यांच्या खात्यावर वर्ग केली. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावरील सही खातेदाराची आहे. बँकेचा शिक्का आहे. पासींग ऑफीसरची आदयाक्षरे आहेत. त्यास **निशाणी ९५** देण्यात येते. दि.०२/११/२०२३ रोजी रु.१ लाख धनंजय आंकनगीरे ने नामदेवच्या खात्यावर वर्ग केली. सदर खातेउतारा मी आमच्या बँकेच्या संगणकातील असून आमच्या प्रिंटरवर काढून घेतलेला आहे. मी याचा भारतीय

**नि.दि.दा.क्र.११/२०२१**
**भागीरथाबाई  वि. शासन**
**वादी तर्फे सा.क्र.४**
**(नि.क्र.९४)**

पुरावा कायदयाअंतर्गत दाखला देऊ शकतो. खाते उतारातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे.

**( दाखला आण्यासाठी तहकुब.)**

**श्रवणोत्तर स्विकृत**

समक्ष

**स्वाक्षरीत/-**
**( एस.एन.सरडे )**
**दिनांक १६/०१/२०२६.** **दिवाणी न्यायाधीश व.स्तर, अहमदपूर.**